

जैन दर्शन ३


वैश्विक जैन यात्रास्थलदर्शन




डॉ. श्रेणिक सुरेश सरडे








जैन दर्शन

(भाग-३)

डॉ. श्रेणिक सुरेश सरडे

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : २२ जुलै २०२५

लेखकाचा परिचय



मी डॉ. श्रेणिक सुरेश सरडे, राहणार कवठे पिराण तालुका ः मिरज. जिल्हा ः सांगली. माझे पदवी आणि पदव्युतर शिक्षण हे इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी मध्ये झाले आहे. मी माझे डॉक्टरेट हे शिवाजी विदयापिठात इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी मध्ये २०२४ ला पुर्ण केले आहे. मी १६ वर्षे झाले अभियांत्रिकी विदयालयात प्राध्यापक म्हणून काम करत आहे. ई साहित्यमध्ये माझे भयान रात्र, जैन धर्म आणि जैन धर्म (भाग - १) हे पुस्तक प्रकाशित झाले आहेत.

पत्ता ः कवठे पिराण

तालुका ः मिरज , जिल्हा ः सांगली (४१६४१७)

मोबाइल नंबर ः ९०११४६४८३८

प्रस्तावना

जैन दर्शन (भाग - ३) या पुस्तकात जैन धर्मातील धार्मिक स्थळांची माहिती दिली आहे. याची सर्वांना माहिती व्हावी हा यामागचा उद्देश आहे. या पुस्तकामध्ये कर्नाटक, महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि तामिळनाडू या राज्यातील धार्मिक स्थळा बद्दल माहीती दिली आहे. या पुस्तकामध्ये जैन धर्मातील प्राचीन तिर्थस्थळाविषयी ही माहीती देण्यात आली आहे.

डॉ. श्रेणिक सुरेश सरडे

पत्ता ः कवठे पिराण

तालुका ः मिरज. जिल्हा ः सांगली (४१६४१७)

मोबाइल नंबर ः ९०११४६४८३८

१. कर्नाटकातील धार्मिक स्थळे

१) प्राचीन जैन बसदी, हल्लूर ः

प्राचीन जैन बसदी ही कर्नाटकातील बागलकोट जिल्हातील हल्लूर येथे आहे. ९ व्या शतकात बांधलेले हे जैन मंदिर आहे. येथे जैन प्रतिमा आहेत. नवग्रहाच्या बाहेरील भिंतीवर २४ तीर्थंकर कोरलेले आहेत.











२) प्राचीन दिगंबर जैन मंदिर, बिलगी ः

प्राचीन दिगंबर जैन मंदिर हे कर्नाटकातील उत्तर कन्नड जिल्हातील बिलगी येथे आहे. याचे दुसरे नाव श्वेतापूरा आहे. हे मंदिर हे १२ व्या शतकातील आहे. त्याला त्रिकूट बसदी म्हणतात.त्यांचे तीन जिनाबिंबा म्हणजे भगवान महावीर, भगवान पार्श्वनाथ आणि भगवान नेमिनाथ हे आहेत.







३) प्राचीन श्री १००८ भगवान शांतीनाथ दिगंबर जैन मंदिर, हलेबिडू ः

प्राचीन श्री १००८ भगवान शांतीनाथ दिगंबर जैन मंदिर हे कर्नाटकातील हसन जिल्हातील हलेबिडू येथे आहे .















४) श्री १००८ भगवान पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, अम्मांगी ः

श्री १००८ भगवान पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर हे कर्नाटकातील बेळगाव जिल्हातील अम्मांगी येथे आहे . हे मंदिर ९ व्या शतकात बांधले गेले .









५) प्राचीन महावीर दिगंबर जैन मंदिर, शामनूर ः

प्राचीन महावीर दिगंबर जैन मंदिर हे कर्नाटकातील दावणगीरी येथील शामनूर येथे आहे.



६) जैन मंदिर, दानावुलापाडू ः

हे जैन मंदिर कर्नाटकातील कडप्पा जिल्हातील येथील दानावुलापाडू येथे आहे. हे एक प्राचीन जैन मंदिर आहे.



७) चतुर्मख बसदी, गेरूसोप्पा ः

चतुर्मख बसदी ही कर्नाटक राज्यातील उत्तर कन्नड जिल्हातील होन्नावर तालुकातील गेरूसोप्पा येथे आहे. हे मंदिर शरावतीच्या काठावर वसलेले आहे. ही एक चतुर्मख बसदी आहे कारण याला चार प्रवेशव्दार आहेत. बसदीमध्ये चतुर्मख मुर्ती आहे. या चतुर्मख मुर्ती मध्ये भगवान आदिनाथ, भगवान अजितनाथ, भगवान संभवनाथ आणि भगवान अभिनंदननाथ आहेत.







८) श्री पार्श्वनाथ जैन बसदी, कुंदद्री ः

श्री पार्श्वनाथ जैन बसदी, कुंदद्री ही कर्नाटकातील शिमोगा जिल्हात असलेल्या घनदाट जंगल असलेली टेकडी आहे. या डोंगरावर १७ व्या शतकातील मंदिर आहे. हे भगवान पार्श्वनाथांना समर्पित आहे. या ठिकाणी आचार्य कुंदकुंदना आश्रय दिला गेला होता.









९) श्री पार्श्वनाथ जिन मंदिर, श्रृंगेरी ः

श्री पार्श्वनाथ जिन मंदिर ही कर्नाटकातील चिकमंगलुरू जिल्हात असलेल्या श्रृंगेरी येथे आहे. हे मंदिर इ.स. ११५० ला बांधले गेले असावे. मुख्य मंदिर ५० फूट लांब आणि ३० फूट रूंद आहे.







१०) श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन बसदी, कुबतुरू ः

श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन बसदी ही कर्नाटकातील शिवमोगा जिल्हातील कुबतुरू येथे आहे. ही बसदी भगवान पार्श्वनाथांना समर्पित आहे. ही बसदी १०१७ ला बांधली गेली आहे.





११) जैन बसदी, होसकोटे ः

हि जैन बसदी कर्नाटकातील म्हैसूर जिल्हातील होसकोटे येथे आहे. हे एक धरण्याच्या बॅक पाण्यावर वसलेले जैन बसदी आहे. येथे ५ जैन बसदी आहेत. त्यामध्ये भगवान आदिनाथ, भगवान शांतीनाथ, भगवान नेमिनाथ, भगवान महावीर आणि भगवान बाहुबली यांची मंदिरे आहेत. भगवान बाहुबली यांची १८ फूट उंचीची मुर्ती आहे.









१२) अक्काना बसदी ः

अक्काना बसदी हि कर्नाटकातील हसन जिल्हातील श्रवणबेळगोळा येथे आहे. हे जैन मंदिर ११८१ साली बांधले गेले आहे. येथे भगवान पार्श्वनाथ हे मुलनायक आहेत. या मंदिरामध्ये धरनेंद्र यक्ष आणि पद्मावती देवीची शिल्पे आहेत.











१३) दिगंबर जैन मंदिर, बिदारे ः

दिगंबर जैन मंदिर, बिदारे हे कर्नाटकातील तुमकुरू जिल्हात आहे. हे मंदिर भगवान सुपार्श्वनाथांना समर्पित आहे. हे मंदिर १000 वर्षापेक्षा अधिक जुने आहे.



१४) साविरा कंबाडा मंदिर, मुदाबिद्री ः

साविरा कंबाडा मंदिर हे कर्नाटकातील मुदाबिद्री येथील १000 खांबांसाठी प्रसिद्ध असलेले बसदी आहे. त्याला त्रिभुवन तिलक कुमानी असेही म्हणतात. या मंदिरात भगवान चंद्रप्रभूची ८ फूट उंचीची मुर्ती आहे. मुदाबिद्री शहर १८ जैन मंदिरांसाठी प्रसिद्ध आहे.









१५) श्री १००८ अतिशय पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, कृष्णा कित्तूर ः

श्री १००८ अतिशय पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर हे कर्नाटकातील बेळगाव जिल्हातील कृष्णा कित्तूर येथे आहे. येथे भगवान पार्श्वनाथांची प्रतीमा सापडली आहे. जी सकाळ, दुपार आणि संध्याकाळ च्या वेळेनुसार बदलत असते.







१६) चतुर्मुख जैन बसदी, करकला ः

चतुर्मुख जैन बसदी ही कर्नाटकातील उडपी जिल्हातील करकला येथे आहे. ही बसदी १६ व्या शतकात सांतारा घराण्यातील इम्मादी भैरास वोदेया यांनी बांधली. या मंदिरात भगवान अरहनाथ, भगवान मल्लिनाथ आणि भगवान मुनीसुव्रतनाथ आहेत.





१७) श्री १००८ पार्श्वनाथ भगवान दिगंबर जैन (पंचकुट मंदिर) अतिशय क्षेत्र हरसूर ः

श्री १००८ पार्श्वनाथ भगवान दिगंबर जैन (पंचकुट मंदिर) अतिशय क्षेत्र हे कर्नाटकातील कलबुर्गी जिल्हातील हरसूर येथे आहे. येथे भगवान पार्श्वनाथांच्या दोन मुर्ती विराजमान असून त्याची उंची ८ फूट व रूंदी ४ फूट आहे. तसेच भगवान मुनीसुव्रतनाथजी, अरहननाथजी आणि चंद्रप्रभूची मुर्ती असून देवी पद्मावतीची ४ फूट उंचीची मुर्ती आहे. हे मंदिर इ.स. १०९७ पुर्वी बांधले गेले आहे.









१८) श्री दिगंबर जैन मंदिर, कागवड ः

श्री दिगंबर जैन मंदिर याला ब्रम्हनाथ मंदिर ही म्हणतात. हे मंदिर कर्नाटकातील बेळगाव जिल्हामध्ये कागवाड येथे आहे. हे अतिशय प्राचीन मंदिर असून येथे भगवान श्री १००८ पार्श्वनाथ आणि भगवान श्री १००८ शांतीनाथ यांचे जमिनीखाली मंदिर आहे. हे मंदिर मशिदीप्रमाणे दिसते.







१९) हुमचा जैन मंदिरः

हुमचा जैन मंदिर हे भारताच्या कर्नाटक राज्यातील शिमोगा जिल्हातील हुमचा गावात आहेत. इ.स. सातव्या शतकात हे मंदिर बांधले गेले. पद्मावती बसदी हे या मंदिरापैकी सर्वात प्रसिद्ध मंदिर आहे.





२०) पद्मावती जैन मंदिर, उगार बुद्रुक ः

पद्मावती जैन मंदिर हे भारताच्या कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्हातील उगार बुद्रुक गावात आहे. पद्मावती देवीचे प्रसिध्द जैन मंदिर तेथे आहे. तेथेच श्री १००८ भगवान नेमीनाथाचे मंदिर आहे.





२ . मध्यप्रदेशातील धार्मिक स्थळे

१) श्री दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, गोलाकोट ः

श्री दिगंबर जैन अतिशय क्षेत्र हे मध्यप्रदेशातील शिवपुरी जिल्हातील गोलाकोट येथे आहे. येथे भगवान आदिनाथांपासून ते भगवान पार्श्वनाथांपर्यत च्या अति प्राचीन मुर्ती आहेत.











२) श्री दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, बर्ही (वल्लभपूर) ः

श्री दिगंबर जैन अतिशय क्षेत्र हे मध्यप्रदेशतील भिंड जिल्हातील बर्ही (वल्लभपूर) येथे आहे. येथे १२00 वर्ष जुने प्राचीन मंदिर आहे. तेथे १0 आणि ११ व्या शतकातील प्रतिमा आहेत. येथे भगवान अजितनाथांची पद्मासनातील पाषाण प्रतिमा आहे.







३) श्री दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, कॅवला ः

श्री दिगंबर जैन अतिशय क्षेत्र हे मध्यप्रदेशातील भानपूरा येथील कॅवला येथे आहे. येथे भगवान नेमिनाथ हे मुलनायक आहेत.



४) श्री दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, कोनी ः

श्री दिगंबर जैन अतिशय क्षेत्र हे मध्यप्रदेशातील जबलपूर कोनी येथे आहे. येथील मुर्ती १0-११ व्या शतकातील आहेत.





५) श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, समसगढ ः

श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर हे मध्यप्रदेशातील जिल्हातील भोपाळ जिल्हातील समसगढ येथे आहे. येथे भगवान पार्श्वनाथांची सुंदर प्रतिमा आहे.







६) प्राचीन श्री दिगंबर जैन मंदिर, बारासो ः

प्राचीन श्री दिगंबर जैन मंदिर हे मध्यप्रदेशातील भिंड जिल्हातील बारासो येथे आहे. तेथे प्राचीन जैन मुर्ती आहेत.





































७) श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर, भोपाळ ः

श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर हे मध्यप्रदेशातील भोपाळ येथे आहे. हे सर्वात जुने जैन मंदिर आहे.









८) सोनागिरी दिगंबर जैन मंदिर दतिया ः

सोनागिरी दिगंबर जैन मंदिर मध्यप्रदेशातील दतिया येथे आहे. येथे ९ व्या शतकातील अनेक प्राचीन जैन मंदिरे आहेत. याला लघू सम्मेद शिखर म्हणून ओळखले जाते. पहाडावर ७७ मंदिरे असून २६ मंदिरे गावात आहेत. पहाडावरील ५७ मंदिर हे मुख्य मंदिर असून तेथे १७ फूट उंच भगवान चंद्रप्रभू ची मुर्ती आहे.येथे भगवान चंद्रप्रभू चा १७ वेळा समवशरण आले होते.














९) श्री दिगंबर जैन सिद्ध क्षेत्र अहारजी ः

हे श्री दिगंबर जैन सिद्ध क्षेत्र मध्यप्रदेशातील टिकमगढ जिल्हातील अहारजी येथे आहे. येथे जमीन मध्ये जैन मुर्ती मिळाला होत्या. हे मंदिर ११00 – १५00 मधील असावे. मुख्य मंदिरामध्ये भगवान शांतीनाथांची प्रतीमा आहे.त्याचा बाजूला भगवान कुंथुनाथ आणि अरहनाथ भगवानांची प्रतीमा आहे. या मंदिरा शिवाय येथे ७ मंदिर आहेत.





३. तामिळनाडूतील धार्मिक स्थळे

१) तिरूमलाई जैन मंदिर, तिरूमलाई, तामिळनाडू ः

तिरूमलाई जैन मंदिर येथे कुंथावई जिनलय मंदिर, महावीर मंदिर आणि पार्श्वनाथ मंदिर आहेत. भद्रबाहु यांच्यासह आलेल्या ८००० जैन मुनींनी येथे तपश्चर्या केली आणि येथे निर्वाण प्राप्त केले असे मानले जाते. येथे इ.स. १०२४ चा एक शिलालेख आहे ज्यात कुंथावई जिनलय मंदिराचा उल्लेख आहे. हे मंदिर तिरूमलाई टेकडीच्या माथ्यावर असून महावीराचे कोरीव काम असून त्यात दोन सिंह आहे. या मंदिरात भगवान नेमिनाथाचे १६.२५ फूट अखंड शिल्प आहे. १६ व्या शतकात कुंथावई जिनलय मंदिराचा पश्चिमेला भगवान महावीरांचे दुसरे मंदिर बांधण्यात आले. १७ व्या शतकात भगवान पार्श्वनाथांचे तिसरे मंदिर बांधण्यात आले.













२) चिरथल जैन मंदिर ः

हे जैन मंदिर तामिळनाडूतील कन्याकुमारी जिल्हातील चिरथल गावाजवळ आहे. हे मंदिर ९ व्या शतकातील आहे.







३) समनार हिल्स ः

समनार हिल्स ज्याला समनार मलाई किंवा अमनारमलाई किंवा मेलमलाई असेही म्हटले जाते. हे तामिळनाडू राज्यातील मदुराई शहाराच्या पश्चिमेस किलाकुयिल्कुडी गावाजवळ डोंगरांचा खडकाळ पट्टा आहे. येथे तिर्थंकरांच्या मुर्ती कोरलेल्या आहेत.













४) नागराज जिन मंदिर, नागरकोइल ः

श्री नागराज जिन मंदिर ही तामिळनाडूतील नागरकोइल येथे आहे. हे मंदिर १२ व्या शतकाच्या आधीचे असावे. येथे तीर्थंकरांच्या सहा मूर्ती आणि पद्मावती देवीचा समावेश आहे. मंडपाच्या खांबांवर भगवान महावीर आणि भगवान पार्श्वनाथंच्या प्रतिमा आहेत. इ.स. १५२१ च्या पाषाणकालीन नोंदीवरून त्याकाळी जैन मंदिर म्हणून त्याचा वापर होत असे याची साक्ष मिळते.







५) जिना कांची जैन मठ, मेलचिथामुर ः

जिना कांची जैन मठ, मेलचिथामुर हा एक जैन मठ आहे. जो तामिळनाडू राज्यातील विल्लुपुरम जिल्हातील मध्ये आहे. येथे दोन मंदिरे असून त्यातील एक भगवान पार्श्वनाथांना समर्पित आहे. दुसरे मंदिर मल्लिनाथाला समर्पित असून ते मुळात भगवान बाहुबली, भगवान पार्श्वनाथ, भगवान आदिनाथ, भगवान महावीर आणि अंबिका याक्षी यांच्या दगडी मुर्ती होत्या. या प्रतिमा ९ व्या शतकात कोरल्या गेल्या.

















६) अरूगर जैन मंदिर, पूंडी ः

अरूगर जैन मंदिर हे तामिळनाडूतील तिरूवन्नमलाई या जिल्हातील पूंडी, अरणी येथे आहे. हे मंदिर चोलांनी बांधले होते.











७) श्री पोन्नूर मलाई दिगंबर जैन अतिशय क्षेत्र ः

श्री पोन्नूर मलाई दिगंबर जैन अतिशय क्षेत्र हे तामिळनाडूतील तिरूवन्नामलाई जिल्हातील पोन्नूर मलाई (पोन्नूर हिल्स) येथे आहे. हे अतिशय क्षेत्र २000 वर्षा हून अधिक प्राचीन क्षेत्र आहे. आचार्य कुंदकुंद यांची तपोभूमी आहे. येथे भगवान महावीरांची प्राचीन मुर्ती आहे.






८) श्री मल्लिनाथ भगवान जैन मंदिर, मन्नागुडी ः


श्री मल्लिनाथ भगवान जैन मंदिर हे तामिळनाडू मधील मन्नागुडी येथे आहे. हे मंदिर मल्लिनाथ भगवान यांना समर्पित आहे. येथे पद्मावती देवीची मुर्ती आहे.










जैन धर्म
श्रेणिक सुरेश सरडे
अहिंसा
परस्परोपग्रहो जीवानाम्
जैन धर्म


जैन धर्म
श्रेणिक सरडे


जैन दर्शन १
वैश्विक जैन यात्रास्थलदर्शन
डॉ. श्रेणिक सुरेश सरडे


जैन दर्शन २
वैश्विक जैन यात्रास्थलदर्शन
डॉ. श्रेणिक सुरेश सरडे